कर्तव्य बजावताना मृत पावलेल्या पोलीस/
सैन्य दलातील कर्मचारी/अधिकारी यांच्या
वारसांना [ पत्नी किंवा मुले ] घरबांधणीसाठी
शासकीय जमीन मंजूर करणेबाबत....

---

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: जमीन. १०९८/२७/प्र.क्र.२०/ज-१
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.
दिनांक:- १७.११.१९९८.

## परिपत्रक

महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीचे वितरण करणे] नियम, १९७१ च्या नियम २८ मध्ये निवासी प्रयोजनासाठी जमीन देण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार स्वातंत्र्य सैनिक, सशस्त्र दलातील नोकर, सुवर्णकार आणि सरकारी नोकर यांना जमीन विना लिलाव देण्याची तरतूद आहे. तथापि, कर्तव्य बजावताना मृत पावलेल्या पोलीस व सैन्य दलातील कर्मचारी/अधिकारी यांच्या वारसांना निवासी प्रयोजनासाठी जमीन देण्याची स्पष्ट तरतूद केलेली नाही. त्यामुळे त्यांच्या वारसांना निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन विना लिलाव देता येत नाही. या बाबीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन असा आदेश देत आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीचे वितरण करणे] नियम, १९७१ च्या नियम २८ मधील तरतूदी कर्तव्य पार पाडत असताना मृत पावलेल्या पोलीस/ सैन्य दलातील कर्मचारी/अधिकारी यांच्या विधवा पत्नी किंवा मुले यांना देखील लागू करण्यात याव्यात. सबब, कर्तव्य पार पाडीत असताना मृत पावलेल्या पोलीस/सैन्य दलातील कर्मचारी/ अधिकारी यांच्या वारसांनी [विधवा पत्नी किंवा मुले ] यांनी शासकीय जमिनीची मागणी केल्यास त्यांच्या अर्जाची नियमानुसार छाननी करुन प्रस्ताव सक्षम प्राधिका-यांकडे निर्णयासाठी पाठवावे व नियम २८ मधील तरतूदीप्रमाणे निर्णय घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ ज.का.घरत ]
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,